# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि–४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ च महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठअधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य

एम. आय. डी. सी. कॉम्पलेक्स रोड, गडचिरोली –४४२६०५ (महाराष्ट्र)

दूरध्वनी क्र. ०७१३२–२२३१२० email:-diilgug@gmail.com

पत्र क्र. गोवि./न.न.व.सा./214 /२०२३ दिनांक: १४.०८.२०२३

## परिपत्रक

विषय: **"महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंज" उपक्रम प्रभावीपणे राबविण्याबाबत.**

**संदर्भ:** शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/मवि-१/संकीर्ण/२०२३/८९१ दि. ०७/०८/२०२३.

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व शासकीय, अशासकीय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित, मॉडेल डिग्री महाविद्यालय, अशा महाविद्यालयाचे सन्माननीय प्राचार्य तथा विभागप्रमुख, पदव्युत्तर शैक्षणिक विभाग यांना कळविण्यात येते की, राज्यातील नाविन्यपूर्ण संकल्पना आणि नवउद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत **"महाराष्ट्र राज्य नाविन्यपुर्ण स्टार्टअप धोरण"** जाहीर करण्यात आले आहे. सदर धोरण प्रभावीपणे राबविण्यासाठी **'महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी'** ही नोडल एजन्सी म्हणून कार्यरत आहे. या धोरणाच्या माध्यमातुन राज्यामध्ये स्टार्टअप परिसंस्था बळकट करण्याकरीता, इनक्युबेटर्सची स्थापना व विस्तार, गुणवत्ता परिक्षण व बौध्दिक संपदा हक्कासाठी अर्थसहाय्य, ग्रँड चॅलेंज, स्टार्टअप वीक यासारख्या अनेक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.

राज्यातील विद्यार्थ्यांच्या नवसंकल्पनांना मूर्त स्वरुप देण्यासाठी महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीमार्फत महाराष्ट्र स्टूडंट इनोव्हेशन चॅलेंजचे आयोजन करण्यात येत आहे. राज्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या नवसंकल्पनांचा शोध घेणे व त्यांचे नवद्योगजकतेचे स्वप्न साकार करण्यासाठी योग्य ते पाठबळ पुरविणे हे या उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

सदर उपक्रमाचे अनावरण दि. १५ जुलै २०२३ रोजी मा. मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजगता आणि नाविन्यता - महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते करण्यात आले असून राज्यातील सर्व शैक्षणिक संस्थांना सदर उपक्रमामध्ये सहभागी होता येणार आहे.

| | |
|---|---|
| **पहिला टप्पा** | |
| शैक्षणिक संस्थाची नोंदणी | १५ जुलै - १५ ऑगस्ट, २०२३ |
| विद्यार्थ्यांकडून अर्जासाठी मागणी | ०१ ऑगस्ट - ३१ ऑगस्ट, २०२३ |
| संस्था स्तरावर सादरीकरण सत्र | १० सप्टेंबर - २० सप्टेंबर, २०२३ |
| संस्थानिहाय सर्वोत्कृष्ट नवसंकल्पनांची घोषणा | २३ सप्टेंबर, २०२३ |
| **दुसरा टप्पा** | |
| जिल्हास्तरीय १०० सर्वोत्कृष्ट नवसंकल्पनांची घोषणा | २५ सप्टेंबर, २०२३ |
| प्रशिक्षण सत्र | २७ सप्टेंबर - ५ ऑक्टोंबर, २०२३ |
| जिल्हा स्तरावर सादरीकरण सत्राचे आयोजन | ६ ऑक्टोंबर - १५ ऑक्टोंबर, २०२३ |
| प्रत्येक जिल्हयातून १० विजेत्यांची घोषणा | १८ ऑक्टोंबर, २०२३ |
| **तिसरा टप्पा** | |
| इनक्युबेशन सहाय्यासाठी मॅपिंग करुन इनक्युबेशन प्रोग्रामला सुरुवात | १२ महिन्यांसाठी इनक्युबेशन सहाय्य |
| इनक्युबेशन प्रोग्राम | |
| राज्यस्तरावर सादरीकरण सत्र आणि विजेत्यांची घोषणा | |

महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंजबाबत नोंदणी प्रक्रिया व अधिक माहिती महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीच्या www.msins.in व http://schemes.msins.in याअधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सदर उपक्रमामध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी नोंदणी करुन सदर उपक्रमाचा लाभ घ्यावा यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन करावे. व त्यासंबंधीचा अहवाल विद्यापीठाच्या नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य विभागास सादर करावा.

14.8.2024

डॉ. अनिल चिताडे
संचालक (प्र.)
नवोपक्रम नवसंशोधन व साहचर्य
गोंडवाना विद्यपीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी:**

१. मा. कुलगुरु यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरु यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे, यांना माहितास सादर.
४. मा. अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
५. मा. कुलसचिव यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
६. श्री. अमोल खोडवे, सिस्टिम ॲनालिस्ट, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली. यांनी सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रकाशित करावे व विद्यापीठाशी संलग्नित सर्व प्राचार्यांना अवगत करावे.